# प्रकरण दुसरे

## " तहान " ची संरचना "

प्रस्तुत प्रकरणांत तहानचे आशयसूत्र व संरचनेचा शोध घेण्याचे ठरविले आहे. " तहान " या कादंबरीची संरचना पाहत असताना " तहान " वेगळा आशय मांडणारी सामर्थ्यशाली कादंबरी आहे असे जाणवते. या कादंबरीत मुख्य आशयसूत्रास भरघोस करणारी विविध उपआशयसूत्रे आहेत.

तहानच्या मुख्य व उप आशयसूत्रांची मांडणी पुढीलप्रमाणे करता येईल.

मुख्य आशय सूत्र : खेड्यातील पाणी टंचाई

उप आशयसूत्रे :

१. शिवार - शेते, गुरे-ढोरे, पशु-पक्षी यांना अभावग्रस्त परिस्थितीत सोसावी लागणारी झळ.

२. नागरी संस्कृतीचे गावावर होणारे सर्वव्यापी आक्रमण.

३. खेडे व तेथील राजकारणात सामान्य माणसांची भरड.

४. भौतिक सुखाच्या मृगजळाच्या पाठीमागे लागलेली तरुण पिढी.

५. ग्रामीण भागातील लोकांची सुडाची तहान

६. जुन्या- नव्या पिढीतील संघर्ष

७. रत्ना व बबन दोघांमध्ये निर्माण झालेले नाते.

८. पैशाची तहान लागलेल्या बबन शेवाळेच्या कुटुंबांची दुर्दशा.

९. खेड्यातील व्याप -यांची मतलबी वृत्ती.

प्रथमदर्शनी वरीलप्रमाणे या कादंबरीतील आशयसूत्रे सापडतात. या आशयसूत्रांच्या मांडणीतून " तहान"ची संरचना लेखकाने घडविली.

आहे. या संरचनेच्या शोध उपरोक्त आशयसूत्रांच्या साहयाने घेऊ.

## " खेड्यातील पाणी टंचाई "

या कादंबरीतील मुख्य आशयसूत्र खेड्यातील पाणी टंचाई, पाण्याची तहान हे आहे. या आशय सूत्राची मांडणी लेखक सरळपणे करतो.

स्वातंत्र्य मिळून अर्ध शतकं लोटलं तरी पिण्याच्या पाण्याची समस्या अनेक खेडेगावात कायमची आहे. सर्व खेडी टँकरमुक्त करण्याच्या आवेशपूर्ण घोषणा मुख्यमंत्री व इतर मंत्री करतात, पण पाण्यावाचून तळमळणारी खेडी तशीचं राहिलेली आहेत. याचा त्रास बायामाणसांना होतो. ओंजळभर पाण्यासाठी त्या रानामाळातं फिरतात. हातपंपाने किंवा विहिरीतील, डबक्यातील पाणी उपसून आपली तहान भागवताना लोकांना नको जीव होतो. त्यातून पशु-पक्षी, गुरे-ढोरेही सुटत नाहीत.

विदर्भातील खेड्या-खेड्यातून भयानकपणे जाणवणारी पाण्याची तीव्र टंचाई, आज शहरात हा प्रश्न अद्यापही तेवढा भीषण नाही मात्र खेड्यातील त्याचे स्वरुप फार विक्राळं असे आहे. अंघोळ, धुणे, पुसणे हया नंतरच्या गरजा सोडल्या तर मुळ गरज आहे माणसाचे-जित्राबाचे पिण्याची पाणी हे पिण्याचे पाणी सुध्दा मिळत नाही, तेंव्हा डोळ्यातील पाणी आपोआपचं आटून जाते. हे पाणी हाच " तहान" कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. पाण्यासाठी होणारे खेडूतांचे हाल आणि त्या अंगाने विस्कटून जाणारी समाजव्यवस्था, माणसा-माणसामध्ये निर्माण होणारी दरी. याचे चित्रण भरीव देशमुख तहानची संरचना उभी करतात.

" आजचे खरे खेडे मराठी साहित्यातून दिसत नाही, असे मध्यंतरीच्या काळात ऐकायला येत होते त्या दृष्टिकोनातूनही मी अधिक जागरूक व अंतर्मुख झालो होतो." [1]

" गेल्या चार-पाच वर्षांपासून मी या कादंबरीची मांडामांड करण्यात आणि लेखनात गुंतून गेलो होतो -" [2] लेखक सदानंद देशमुख यांनी आपल्या " मनोगता"त वरील उद्गार केले. त्यातून त्यांचे लक्ष पाणी समस्या, आजचे खरे खेडे आणि त्या चित्रणासाठी दीर्घ परिश्रम या गोष्टीकडे लक्ष लागले होते, हे लक्षात येते.

सारंगपूर नावाच्या खेड्यातील पाणी टंचाई याचे चित्रण देशमुख करतात. तहान भागविणे ही मनुष्याची मूलभूत गरज आहे. सोबतच दैनंदिन जीवनात मनुष्याला पाणी हवे असते, पाणी कोठून येते आणि त्यासाठी शासन काय काय करते, हे प्रश्न नागरी जीवनात माणसाला भेडसावत नाहीत. शहरात सहज पाणी उपलब्ध होते. मोठ मोठया यंत्रणा त्यासाठी कार्यरत असतात. नळांना पाणी कमी आले की शहरात सर्वत्र असंतोष पसरतो. वर्तमानपत्रे गाजवली जातात. लक्षवेधी सूचना मांडल्या जातात. परंतु शहरापासून अंतर राखून असणाऱ्या खेड्या-पाड्यात पाणी पुरवठ्याच्या योजना पोहचत नाहीत. अनेक योजना कागदपत्रावरचं असतात तर एखादी योजना गावकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसून आशेची ज्योत मनामनात पेटवून जाते पाणी भरण्याचे काम स्त्रियांना करावे लागते. जिथे पाणी मिळतं नाही तिथे पाच कोसावरून पाण्याचे हंडे डोक्यावरून वाहून आणावे लागतात.

या खेड्यामध्ये दोन हातपंप. गावाजवळचा हातपंप जेव्हा खाली वर करावा तेव्हा त्यातून चुळकाभर पाणी खाली सांडायच. तोटीचं भांड भरायला बराच वेळ लागायचा. प्रत्येक घरातील एका माणसाला हे ओळीत भांड घेऊन थांबण्याचं काम नेमून दिलेल असायचं हातपंपावर ओळीत भांड ठेवणाऱ्या बायकांची गर्दी असायची.

पाणी भरण्यासाठी बायकांची वारंवार भांडणं व्हायची. कधी कधी बायका एकमेकींच्या झिंज्या ओढायाच्या पाण्यासाठी हुकलेल्या नंबरावरुन जुनी दुश्मनी काढण्यासाठी या पाण्यासाठी माणसांला माणसं ओळखनासं. माणसातील माणुसकी संपत चालली होती.

या मंडळींना भकास गावचा विकास हवा आहे. कायम स्वरूपी नळ योजना हवी आहे. शेजारच्या गावचा विकास झाला अन् आजून आपणं मागचं आहे ही जाणीव त्यांच्या लक्षात येते.

पिण्यास पाणी मिळत नाही तर आंघोळीला पाणी कोठून आणायचं. प्रमोद नवले म्हणतो: - " काय सांगु ? आठ रोजापासून मपला संसार बंद हाये हया पाण्यापायी आंघोळीच बंद हायेत. पुलावरच्या हापशीचं प्यायपुरतं पाणी कांतरी घरातले आणतात. म्हणूनच कोणाचं आंघोळ करायच्या नादंत आस फमॉन काढा आमच्या म्हातारीनं [3] तर होगे दुकानदार म्हणतो - " हे नाई जमनारं हो भाजीबुवा... वाटलं तर जेवून जा आमच्या घरुन पण पाणी नका मागू गिलासभरची पाणीचं नाई घरातं, आमीचं त तहान लागली की एका एका घोटात नल्डा अन् ओठ वल्ले करुनं आल्यापाणी करतो...[4]

कुतरवाडीच्या रामा उमाळेची पोरगी विहिरीत पडली. पाण्यासाठी वणवण फिरतं तिचं जीवन संपल होतं. पाण्यासाठी जीता-जागता जीव गेला होता. विहिरीच्या तळाशी पाच-सहा माणसे होती. त्यांनी पोरीचं प्रेत ठेकणीच्या खडकाचा टेकू देऊन वरतं केल. तळाच्या मधल्या भागात झिऱ्यासारखा खड्डा होता त्यात तिचं रक्त सांडल होतं. पण ते संगळं रक्तच आहे असं वाटतं होतं. " सालं सम्द रगतं झाल - पाण्यात, खडकावर, काठावर आता काई हया इहिरीचं पाणी प्यायच्या कामी येत नाई. कोणी लोक चुकचा-चुकचा काढत

वहते. तहान भागवत वहते. तिच्यातंही गाळं रुतत.... .[5]

उन्हाळ्यात तापणाऱ्या उन्हाने जीवाची लाही लाही होते पिण्यासाठी पाणीचं उपलब्ध नसते. गावातले हातपंप कोरडे झालेले असतात. नद्या, नाले ही कोरडे ठन्न, पारखेड गावाला आग लागल्यावर आग विझवायला पाणी नसते. संपूर्ण गाव आगीत बेचिराख होते. सरकारी तोकडी मदतही गावकऱ्यांच्या हाती लागत नाही. सारंगपूरचे लोक शेजारी म्हणून त्यांना मदत करतात. " आग झुवायची तरी कशी ? पाणी तरी कुठून आणायचं ? घरात प्यायचे पाणी नाई. .[6]

पाण्यासाठी दाही दिशा फिरणाऱ्या माणसाचं, गावाचं सदानंद देशमुखांनी प्रभावी चित्रण केले आहे. त्यात निसर्ग बेतालचं आला तरी माणसातल्या प्रकृती -विकृती यथातथा मांडल्या गेल्या आहेत.

सारंगपूरची दुर्दशा उडते. नद्या, नाले, आटतात. विहिरी कोरड्या पडतात. पंचायतीच्या हापशीवर दांडे हाणून हलवून बाया बापड्या बुळणी चुळकीन हंडे, मडकी, उन्हातान्हात, रात्री बेरात्री तासन् तास रांगा लावून भरतात व मेटाकुटीला येतात. गावाबाहेर चार किलोमीटरवरच्या देवराव बापूच्या विहिरीला कायते पाणी असत. पण तिथे जाणारा चिराच्या चढाचा रस्ता ट्रॅक्टरला देखील भारी पडतो अन् बैलगाडींना मरणकळा आणतो.

पाण्यासाठी होणारे लोकांचे हाल आणि त्या अनुषंगाने विस्कटून जाणारी समाजव्यवस्था, माणसा-माणसामध्ये निर्माण होणारी दरी हृदय व परिणामकारक चित्रण " तहान" मधून होते व कथानक घट्ट व बांधीव होत जाते.

महाराष्ट्राच्या खेडयापाडयात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न किती गंभीर आणि जीवघेणा असू शकतो, याची प्रचिती " तहान " वाचल्यावर सहज येऊ शकते. सुन्न करणारे अनुभवविश्व " तहान " मध्ये साकार झाले आहे.

" शिवार-शेते, गुरे-ढोरे, पशु-पक्षी यांना अभावग्रस्त परिस्थितीत सोसावी लागणारी झळ "

या कादंबरीत मुख्य आशयसूत्रास उप आशयसूत्र भरघोस करते. शेते, गुरे, ढोरे, पक्षी यांची पाण्याच्या दुष्काळ असणाऱ्या भागात कशी हालहाल होतात याचे चित्रण करून कथानक लेखक समृध्द करतो.

खेडयातील पाणी टंचाई, पाणी टंचाईच्या भयानक दिवसात केवळ मानवी जीवनच होरपळून निघत नाही तर या ग्रामीण जीवनाचा अविभाज्य घटक असणारे शिवार शेते, गुरे-ढोरे, पशु-पक्षी यांनाही अभावग्रस्त परिस्थितीत फार मोठी झळ सोसावी लागते. अभावग्रस्ततेला पकडून, बनवा-बनवी करून आपला स्वार्थ साधून घेण्यासाठी अनेक ठगे गावागावांतून धडपडत आहेत.

ओंजळभर पाण्यासाठी बायामाणसं रानोमाळ भटकतात हातपंपाने किंवा विहिरीतील, डबक्यातील पाणी उपसून आपली तहान भागवताना लोकांना नको जीव होतो. त्यातून गुरे-ढोरे, पशु-पक्षी सुटत नाहीत.

अशा वेळी गाण्यांचा स्वार्थ सुटत नाही. पाणी टंचाईचा फायदा घेऊन पैसे कमावण्याची नवी संधी अनेकांना मिळते. गावात बैलजोडी आलेले लोक पाण्याचा वापर करतात. पैशामुळे ते गाडी ओढणाऱ्या मुक्या जीवाचीही पर्वा करत नाहीत त्यात अनेक ठगेही असतात.

माणसाच्या मतलबी स्वार्थी उद्दिष्टापोटी प्राणी-जनावरेही कशी चीपाडी खेळ-खेळून बसतात...ते सारे अस्वस्थ करून सोडणारे आहे. गावातली एक नंबरची मुरल्या-ढबिल्या ची जोडी. -दिवस तो वड जिंकून चढण्यांची त्यांची रग आणि या कष्टामुळे होणारी देहझीज व त्यामुळे येणारी गात्र-गलितता, आजार, मारणं, गोमारणं, गोचिडापासून तर कावळ्यापर्यंत वाटयाला येणारी भयानक यातनामय स्थिती, यातून हे करुण चित्र उभारते...खरे तर चित्रं हृदयाला पीळ पाडणारे आहे.

शेती, बैल, पाणी, जमीन यांचे अस्सल ग्रामीण चित्र, प्राण्यांवर प्रेम करणाऱ्यांचे, त्यांना वापरले तरी त्यांच्याच हातामुळे छळणाऱ्यांचे, त्यांना साधन मानून मौज करणाऱ्यांचे वेगळेचं जग याचे चित्रण लेखक करतात.

सारखेड गावाला आग लागते, पाणी नसल्यामुळे आग विझवता येत नाही. त्यात आगीत गुर-ढोरं बांधल्या वांग्यागत होऊन मेली. याचं चित्रण करतात.

राघोजीला स्वतःच्या पोटच्या आतड्यापेक्षा बैलांच्या पोटची आबाळ त्याला भेडसावू लागली. झाडासारखे जोपासलेले बैल हाडाचे सापळे राहिलेले पाहूनं त्याचे मन सैरभैर होऊ लागले. " काई खरं नाही रे देवा आता, मयल्या कुणाचिवीचं माझ्या सोन्यासारख्या बैलायले झाडाचा पाला खाऊनं जगायची पाळी आली...गमदा खानाखराबा झाला..... सत्यानास झाला. "७ या त्यांच्या उद्गारानं जातिवंत शेतकऱ्याची तळमळ त्याचं प्राणी प्रेम लेखक सहजपणे मांडतो.

कादंबरीला प्रारंभ होतो तो बबन शेवाळेच्या उन्हाळा वातावरणातही पिराचा अवघड वढ वढून पाणी आणण्याच्या कामात पटाईत असलेल्या मुरल्या अबिल्याच्या ...निने बाकीचे बैल चार-पाच्या दिवसांत हा वढ वढू शकतात पण इतरांना ते कठीण होते. तो वढ मरणांचा आणि बबनचे बैलही ताठ तब्येतीचे त्याचा बाप रोघोजी शेवाळे मात्र बैल राखण्यात ना-णा पंचक्रोशीत प्रसिध्द होता. चारा-पाणी-खुराक यातून धिप्पाड बैल ठेवून त्यांच्यावर प्रेम करणारा कुटुंबापेक्षा बैलावर जीव लावणारा

कादंबरीच्या शेवटी राघोजीला होणारे भास आपल्यापुढे येतात. " गावातल्या दावणी सुनसानं, गोटे सुनसानं, ढोरचं काय, ढोरायचं कोणाची नाई...गाय नाई...बैल नाई...वासरु नाई... म्हशी नाई...कुत्रे..गिधाडं...कावळे..[८] पाण्याची धार येते, राघोजी तोंड बाजूला करत नाही, तिची तहान सरत नाही.

प्राणी जीवन चित्रणाने कथानक गतीमान होते आणि कादंबरी तील आशयास बहुसारित्व प्राप्त होते.

" नागरी संस्कृतीचे गावावर होणारे सर्वव्यापी आक्रमण "

या कादंबरीत मुख्य आशयसूत्रास उपआशयसूत्रे कथानकाला व्यापकता आणून देतात.

गावातील राजकारण, गटबाजी, स्वार्थी नेतृत्व, अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार आदी बाजूंचा वेध घेत असताना नागरी संस्कृतीने गावावर होणारे सर्वव्यापी आक्रमण देशमुखांनी दाखविले आहे.

" सहान " कादंबरीत सारंगपूर नावाचे प्रातिनिधिक खेडेगांव आहे. गाव महामार्गाला जोडलेले असल्यामुळे शहरी संस्कृतीच्या छायेत विसावलेले आणि कालानुरूप बदल स्विकारणारे आहे. बबन, प्रमोद, मोहन, सतिश सारखे बेरोजगार सुशिक्षित तरूण गावातच काही उठाठेव करून लहान-सहान व्यवसाय करतात.

बबन शेवाळे स्वभावाने सरळ परंतु नागरी संस्कृतीच्या प्रभावात जगणारा तरूण आहे. पाणी विकण्याचा व्यवसाय करतो आणि भरपूर पैसा कमविण्याचे स्वप्नं पाहतो. त्याला भरपूर पैसा मिळतो. आणखी पैसा मिळावा म्हणून मुरल्या-अखिल्या हया बैलांना राबवितो. टायरची नवी गाडी तयार करून घेतो. पिराचा वढ धोक्याचा असतो तरी पर्वा न करता तो पाण्याच्या खेपा वाढवितो बबनचा व्यवसाय हा धोकादायक असून बरकतीचा नाही, ही राघोजीची भावना असते. राम-कोरच्या प्रोत्साहनाने बबन आपला व्यवसायात रमून जातो. बक्कळ पैसा मिळत असल्यामुळे झोपडपट्टीच्या रत्नावर सुध्दा तो उधळतो. गावातील उनाड आणि कुटील मंडळी त्याला एका कटकारस्थानात गोवतात आणि त्यांच्या जवळचा सर्व पैसा लुबाडून घेतात. सोमनाथ हावरे, प्रमोद नवले, मोहन काळे रत्नांच्या प्रकरणात त्याला ब्लॅकमेल करतात आणि कंटाळून तो गाव सोडून जातो.

बबन शेवाळे कास्तकारांचा मुलगा असून शहरी माणसांची स्वप्न बघतो. " आता दणकून ट्रीपा मारायच्या, आपल्या सात पिढ्यानं कमावले नसतील एवढे पैसे कमवायचे.... बंगलाचं बांधतो मग आपून "[९]

नागरी संस्कृतीमुळे गावामध्ये देशमुख बापूकडे ट्रॅक्टर, विहिरीवर मोटर पंप असतो. बबनच्या घरी बहीण वर्षा, व आई रामकोर टी.व्ही. टेपरेकॉर्डरची मागणी करतात पण त्यांच्या मागणीला राघोजी विरोध करतो. " आरे ते डबडं कशाला पाहिजे बे, आपल्या कास्तकाराच्या घरात काय करायचं टी.व्ही " ? [१०]

बबनने मिळविलेल्या चार पैशाच्या जोरावर टायरच्या चाकाची लोखंडी करून घेतो. सतिश मंगरूळे गावातच गॅरेज टाकतो.

पुणे, नागपूर महामार्गावर बस स्टॅन्ड त्या शेजारी शाळा पेट्रोल पंप, ढाबे, हॉटेल, इलेक्ट्रीक बोर्डाचे ऑफीस, स्टेट बँक तर चिखली रोडला सरकारी दवाखाना, पोलीस स्टेशन, विश्रामगृह, ऑईल मिल हे सर्व घटक खेड्यांवर आक्रमण करताना दिसतात याचा उपयोग लेखकाने कथानकाच्या भरघोसपणासाठी चित्रित केला आहे.

शहरांचा जसा झपाट्याने विकास होत गेला आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अंमल सर्वत्र वाढला तसाच तो बहुतांशी महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यांमध्येही पोहचलेला आहे. रस्त्याला जोडलेल्या गांवाना तर शहराचेच रूप आलेले आहे. दृकश्राव्य माध्यमांच्या प्रकारामुळे तर नागरी जीवनातील सूक्ष्म बारकावेही खेड्यापाड्यांनी टिपल्याचे दिसते. खेड्याचे जीवनमान आणि शहरातील नागरी जीवनमान अलिकडच्या काळात समानतेच्या पातळीपर्यंत पोहचण्याची स्पर्धा करताना दिसत आहे. जीवनमानाच्या ह्या उलथापालथीत मात्र माणसाचं माणूसपण हरवल्याची खंत आहे. याचे बारकावे लेखक सदानंद देशमुख करताना

दिसतात. यामुळे खेड्यात घुसणारे शहर आपल्या समोर येते व कादंबरीची संरचना बहुआयामी बनते.

" खेडे व तेथील राजकारणात सामान्य लोकांची भरड "

या कादंबरीतील कथानकात खेडे व तेथील राजकारणात सामान्य लोकांची भरड चित्रित करून लेखक आशयसूत्राला बहुस्तरित्व प्राप्त करून देतो.

ग्रामीण भागातील पाण्याच्या ज्वलंत समस्येबरोबरच माणसांचा स्वार्थ, एकमेकांचा द्वेष, आमदार, मंत्री यांचा ढोंगीपणा हे सर्व लेखकांने प्रत्ययकारीकपणे रंगविले आहे.

पाण्यापायी कोरड्या विहिरीत पडून माणसे मरायला लागली आहेत. सारंगपूरचे हाल सरकारला समजले पाहिजे यासाठी भिमराव शोंडे प्रमोदला वर्तमानपत्रात बातम्या या असं सांगतो पण प्रमोद म्हणतो की बातम्या दिल्या खरं आमदार-खासदाराला कीव आली नाही. टँकर गावात सुरु झालानाही उलट पंचायत समितीचा सभासदानं टँकरच्या नावाखाली पैसा लुटला.

पाण्याच्या दुष्काळाच्या दिवसांत आमदार-खासदार यांचे दौरेही या भागात नसतात. या लोकांचा संताप वाढत आहे याचा राग गावच्या सरपंचावर काढतात. गावातील राजकारण, गटबाजी, स्वार्थी नेतृत्व अधिकाऱ्यांचा भ्रष्टाचार आदी बाजूचा वेध घेतात.

लोणारच्या पारखेड गावाला पळीत पहायला आलेल्या आमदाराच्या गाडीला घेराव घालून सारंगपूरकर ती आपल्या गावाकडे वळवतात. आमदारांनी सारवा सारवी करण्याचा प्रयत्न करूनही प्रक्षुब्ध गावकरी आमदाराच्या गाड्यामागोमागच्यांचा मारा करून पुढाऱ्यांना

गावातन पळून धावतात. या दंगलीत लाठीमार होतो. जीव खाऊनं पळताना म्हातारा राघोबी खोल खड्ड्यात पडून त्याचा पाय मोडतो व तो जागेला खिळतो. आंदोलनाचा परिणामं म्हणून गावातल्या विहिरी, रोज टँकरच्या पाण्यान भरल्या जाऊ लागतात. गढूळलेलं पाणी पिऊन का होईना गावची तहान भागू लागते. टँकरवाले चोरून हॉटेलवाले, ढाबेवाले पाणी विकतात.

गावात काम करणारी ग्रामपंचायत, ग्रामसेवक, आमदार, अधिकारी मंडळी तर केवळं राजकारणं करण्यासाठी आणि योजनांचे पैसे खिशात टाकण्यासाठी आतुर असतात. शासन दरबारी कारवं बोलबाला झाला तर पिण्याच्या पाण्याचा टँकर गावातं पाठविले जातात. यामुळे कथानक वाचनीयं बनते.

## " भौतिक सुखाच्या मृगजळाच्या पाठीमागे लागलेली खेड्यातील तरूण पिढी "

" तहान " या कादंबरीतील भौतिक सुखाच्या मृगजळाच्या पाठीमागे लागलेली खेड्यातील तरूण पिढी कथानकाला व्यापकता आणून देते.

सदानंद देशमुख या तरूण लेखकांच्या " तहान " या कादंबरीचे स्वरूप असे व्यामिश्र आहे. पाण्यावाचून तळमळणारे ग्रामजीवन हा या कादंबरीचा गाभा नाही. माणसे तहानेने व्याकुळतात, पाण्यासाठी तळमळतात, त्याही पेक्षा जास्त तडफड होते. भौतिक सुखाच्या मायावी मृगजळामागे धावणारा तरूण मनाला पाहताना या तडफडीचे आणि त्यातून मागल्या पिढीच्या वाट्याला येणाऱ्या घुसमटीची कहाणी म्हणजे तहान.

आपल्या मनोगतातच ग्रामीण भागासाठी "लोण्या लागलेल्या बुरूजासारखा ढासळणाऱ्या "[११] ग्रामीण समाजव्यवस्थेचे चित्रण करणाऱ्या प्रतिभेचे चिंतन लेखक करतो. समकालीन ग्रामीण वास्तव, त्याचे बदलते रूप, अर्थार्जनाच्या अपुऱ्या संधीमुळे मनाची होणारी सैरट अवस्था, भौतिक सुखाची ओढ, चंगळवादाचे परिस्थितीतील ताणतात होणारे परिवर्तन असा ताऱ्या जटिल ताणांचे चित्र या कादंबरीत उतरते.

शहरातील भौतिक सुखाची रेलचेल आपल्या वाट्याला यावी, याची " तहान " प्रत्येक खेडूताला आहे. या भौतिक सुखाच्या मृगजळाच्या पाठीमागे लागून खेड्यातील तरूण पिढी सैरभैर झालेली आहे. त्या तरूण पिढीची होणारी घुसमट चीढोणी आहे.

माणसातल्या प्रकृती-विकृती मात्र यथातथ्य मांडल्या गेल्या आहेत. निसर्गाची अवकृपा झालेल्या वैराण वातावरणांत माणसं तहानीचं रखरखीत पैशाच्या लोभानं पाणी विकणारा बबन सोनवाळे, बबनला लुबाडणारा हवालदार सोमनाथ व स्थानिक वार्ताहर प्रमोद नवले अशा अनेकांची चित्रण या कथानकात आली आहेत.

बैलाच्या जीवावर पाणी टंचाईच्या काळात पाण्याच्या टाक्या वाहून बबन नगद पैसा मिळवितो. शेतकरी माणूस पाणवाला होऊन " बंबाट " कमाई करतो आहे. त्याला वाटतं, " महापूर पैसे कमवावं, असं, हे नवकरीवाले लय पैसा कमावतात. खुडणं खातात. त्याहयले आपून लुटावं ऐरी पाण्याचा कोन पैसा देते ? "[12] पाणी टंचाई, त्या टंचाईशी पडेल ती किंमत देऊन झुंजणारे गावकरी, नोकरदार आणि त्यांची समस्या सोडविण्यासाठी आर्थिक लूट करतो.

पाण्याच्या मिळालेल्या पैशातून घरामध्ये आई व बहिण टी.व्ही. टेपरेकार्डर मागतात तर बबन लोखंडी टायरची गाडी तयार करून घेण्याचे स्वप्न पाहत असतो. टायरची गाडी लोखंडी टँकरच्या सहयाने जेवढ्या जास्त खेपा मारता येतील तेवढा जास्त पैसा मिळेल, ही त्याची अपेक्षा असते.

बबनसारखा तरुण आधी पैसा, मग स्त्री सुख अशा भौतिक सुखाच्या मृगजळामागे धावतो, आपले ग्रामजीवन आपली कृषीसंस्कृती विसरून कचकड्याच्या शोभिवंत चकचकीत जगामागे धावतो आणि शेवटी त्याच्या वाट्याला येते फक्त अपयश, जगण्याची पैशाची कोंडी, स्वार्थापोटी चिकटणारी बांडगुळांची दुनिया आणि त्यालानवे सगळे

उपसून फेकून द्यावे लागते. पुन्हा नव्या जगाशी सोयरीक जुळवावी लागते.

" तहान " कादंबरीतील पात्रे समाजात ज्याप्रमाणे जीवन जगतं असतात त्याच पध्दतीने रेखाटलेले आहे.

" ग्रामीण भागातील लोकांची सुडाची तहान "

" तहान " कादंबरीतील मुख्य आशयसूत्रास उपआशयसूत्र ग्रामीण भागातील लोकांची सुडाची तहान बळकटी आणणारे आहे.

गा-या गावाला पाणी विकणारा बबन गोवाळे यांच्या घरात पाणी नसल्याच्या कल्पनेनेच हैराण होतो. गल्लीतले कुणीही माणूस त्याच्या आई व बहिणीला तांब्याभर पाणी सुध्दा देत नाहीत. ही गावकऱ्यांची सुडाची तहान आपणास दिसते.

पोलीसांना सर्व काही मोफत हवे असते, पण बबनं त्यांना पाणी विकतं पाजलं त्याचा सूड कसा घ्यायचा याचा विचार सोमनाथच्या डोक्यात असतो. म्हणून रत्नाचं प्रकरण हाताळताना प्रमोद नवले, मोहन वाळे यांच्या मदतीने बबनला लुटतात व ती सूडाची तहान भागवून घेतात.

बबनला रत्नाच्या शरीराची तहान आहे तर रत्नाला बबनच्या पैशाची दागदागिन्यांची तहान आहे. म्हणूनंच फुकटात पाणी घेऊन ती झाडीत बबनची तहान भागविते.

खोच्यांत पाय मोडून बसलेल्या राघोजीला वाटतं कोणीतरी आपल्या जवळ बसून बोलतं रहावं, बायको रागकोर तर आगभरल्या

निखा-याचारवी. बबन पायाला भिंगरी बांधल्यासारखा सतत बाहेर, सगळीच त्याला परकी-परकी वाटायला लागतात. झाडावाणी माणसाचं बी हाय, एका झाडाच्या बियातून दुसरं झाड उगवते पण ते पहयल्या झाडाच्या दूर दूर फटकून उभे राहते तसंच त्याला माणसांला लाभलेली तहान मात्र तशीच राहते.

माणसातल्या प्रवृत्ती-विकृती लेखक सदानंद देशमुख टिपताना दिसतात. त्यामुळे कथानक घट्ट व बांधीव होत जाते.

" जुन्या-नव्या पिढीतील संघर्ष ="

या कादंबरीत मुख्य आशयसूत्रास उपआशयसूत्र भरघोस करते. जुन्या-नव्या पिढीतील संघर्ष याचे चित्रण करून कथानक लेखक समृध्द करतो.

राघोजी शेवाळे आणि रामकोरचे एक लहानसे कुंटूब असते. बबन आणि वर्षा ही दोन मुले घरी होती आणि बैल गावातं बैलाची नावे, गावात पिण्याचा पाण्याचा प्रश्न भेडसावतो आणि बबन शेवाळे बैलाचा वापर पाणी विकण्याच्या व्यवसायासाठी करतो. राघोजीचा बबनच्या व्यवसायाला विरोध असतो. बैलाचा सतत वापर केल्यामुळे बैल निकामी होतील आणि आपला परंपरागत शेती व व्यवसाय नीटपणे करता येणार नाही, अशी भितीची भावना राघोजीला त्रस्त करते.

परंपरागत मूल्ये जपणा-या पिढीचा प्रतिनिधी राघोजी शेवाळे आहे. त्याचं बैलजोडी र प्राणापेक्षा अधिक प्रेम आहे. त्यामुळे त्याला पैसा कःपदार्थ आहे, त्या उलट नव्या पिढीचा प्रतिनिधी त्याचा मुलगा बबनं पैसा हेच मूल्य मानतो. त्याची आई त्याला सामील आहे.

पाणी विकून कधी पाहिला नव्हता एवढा पैसा बबनं घरी आणतो आहे. त्यामुळे पंखा, टी.व्ही. रोज मटण इत्यादी सुखसोयींमुळे ती बबनला आणखी पाण्याच्या खेपा कर, आणखी पैसा मिळवं असे सतत उत्तेजन देते. दिवसाला कधी हजार, कधी आठशे, अशी त्याची पाणी विकून कमाई बघून तिची नजर बदलली आहे. बबनला आणि तिलाही बैलाच्या जीवाची पर्वा नाही. " ते का पाघळतात का उनातं " ते का लोण्याचे गोळे हायेत का ? [13] असे ती त्याला सुनावते. राघोजीला ते बाळकाच्या पोटचे वाटतात. पण आम्ही चांगल करतो... लय पैसे कमावून आणलं त्यानं तुमच्यावाणी न्हाई. वावरांत जायचं अन् दगड घेऊन यायचं.[14] असं ती म्हणते, तुम्ही कमावले कधी बाप जल्मातं एवढे पैसे । असा तिचा प्रश्न आहे. राघोजी विरुद्ध बायको, विरुद्ध बबन हा मूल्य संघर्ष आहे.

इकडं राघोजी पाण्याच्या खेपा करणा-या बैलाचे हाल पाहून तळमळतो पण तो एकटा आहे. बाकी सर्व चैन करण्यात दंग आहेत. पर्वा कोणालानाही. बैल न्यायचे नाहीत हे राघोजीचं म्हणणं कुणी ऐकतं नाही. इथे दोन मूल्य व्यवस्थेचा पहिला संघर्ष उडतो.

राजकोर बबनच्या व्यवसायाला प्रोत्साहन देते. त्याने कमावून आणलेले पैसे आपल्या ताब्यांत घेऊन घराची घडी नीटपणे बसवण्याची धडपड करते. स्वत:साठी दागिने तयार करते. नव-यापेक्षा आपला मुलगा आपल्याला सुख देणारा आहे, ही भावना तिच्या व्यक्तिमत्वात बदल घडवूनं आणते आणि राघोजीचे कुटुंबातील स्थान नगण्य करते.

भौतिक सुखाच्या मृगजळाच्या पाठीमागे लागलेली तरुण पिढी सैरभैर झालेली आहे. त्या तरुण पिढीचो होणारी धुसमट जीवघेणी आहे. जुन्या नव्या पिढींत संघर्षांची बीजे ही भौतिक सुखे उगवत आहेत.

एक पिढी मूल्ये जोपासू पाहते. आपली शेती, गुरे, ढोरे याबाबत काही एक संस्कृती असणारी मूल्ये मानणारी जुनी पिढी तर पैसा हे एकच मूल्य मानणारी, व्यसनात रुतलेली, गावात ठगेगिरी करुन प्रसंगी पोरीबाळींच्या आब्रुवर घाला घालणारी नवी पिढी यामधील हा अटळ जीवनसंघर्ष आहे.

पाणी टंचाईग्रस्त खेडे गावाचे चित्रण करताना दोन पिढ्यांत होणारा संघर्ष लेखक सदानंद देशमुख यांनी सच्चेपणानं चित्रित केला आहे.

आधुनिकतेच्या नावाखाली आपण काय स्विकारले पाहिजे आणि काय नाकारले पाहिजे याचा विवेक नेहमीचं माणसाच्या मनानं जागृतावस्थेत नसतो. परिणामत: दिखाऊ आणि चमकदार जीवनशैली स्वीकारुन जुने नाकारणाऱ्या नव्या पिढीपुढे अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. कुणाचेच काही ऐकायचे नाही, या प्रवृत्तीतूनच नव्या पिढीच्या तरुणांना जीवनात तुटलेपण येते किंवा नैराश्यामुळे भरकटलेपण येते. नवतरुणांच्या आधुनिक समस्यांचे अनेक वारकावे, नवे रुप मांडण्याचा प्रयत्न सदानंद देशमुखांनी " तहान " या कादंबरीत केला आहे.

## " रत्ना व बबन दोघांमध्ये निर्माण झालेले नाते "

या कादंबरीतील मुख्य आशयसूत्रास बळकटी आणण्यासाठी कथानकात रत्ना व बबन या दोघांमध्ये निर्माण झालेले हळूवार नाते हे उपआशय सूत्र याचे चित्रण करून कथानक लेखक समृध्द करतो.

रत्ना उंबरनाल्यात येते तर तिथे पाणी नसते ती इकडे-तिकडे पाणी शोधतं असते. बबन सांगतो इथं पाणी नसतं, तुम्हाला कुणीतरी फसवलं आहे. ती रडायला लागते रत्ना बबनला आवडलेली असते. रत्ना अमरावतीला मावशीकडे राहत होती, पण ती आता गावात आलेली असते. रत्नाला गोंदी अन् राधीनं उंबरनाल्यात पाठविलेलं असतं. सुरूवातीस बबन तिच्या प्रेमात पडतो. रडणा-याला रत्नाला शांत करतो अन् पाण्याची खेप घेऊन येतो. तिला पाणी देतो ती पाण्याच पैसे विचारते पण बबन सांगतो तू रोज इथ येत जा.

पंधरा दिवस घरात गोड चवीचं निवळ पाणी घरात राहायचं. त्यामुळे माय खुश होती. रत्ना उंबरनाल्यात येते त्यावेळी बबन तिची वाट पहात असतो. बबनने दिलेल्या साडीत ती असते. साडी बद्दल आई बापाना दिलेली थातूर मातूर उत्तरे ऐकून बबनं खूप होतो. हॉटेलवरुन आणलेली द्राक्षे तो तिला देतो. ती एक एक चवीने खात असते द्राक्षांच्या घडासारखी निरधळते.

बबनला रत्नाच्या शरीराची तहानं आहे तर रत्नाला बबनच्या पैशाची, दागदागिन्यांची तहान आहे म्हणूनचं कुकटात पाणी घेऊन ती झाडीत बबनची तहान भागविते.

रत्नाचे विचार बबनच्या डोक्यांत नेहमी येत असतात. तो संसाराची स्वप्ने रंगवित असतो. रत्नाबरोबर लग्न केलं तर भावकी काय म्हणेल ? आपल्या बाह्मणीशी लग्न कोण करेल ? की गावातल्या भानगडींत आपणांही भर घालायची. आपल्या जातींत लग्न करायचं लग्न झालं की एकमेकांना विसरुनं जायचं कधी पुढे भेटलो तर ओळख असून ओळखं नसल्यासारखं दाखवायचे. " काम सरो न वैद्य मरो.. ..[१५]

गावातं सभा, मोर्चा पाण्यासाठी चालू असते तर उंबरनाल्यांत बबन आणि रत्ना असतात ही बातमी मोहनं प्रमोदला येऊन सांगतो. उंबरनाल्यात बबनं रत्नाची वाट पहातं असतो त्यावेळी पाठीमागून रत्नांचा बाप तोताराम गालफाडे लाथ घालतो. रत्ना मध्ये येते तर रत्नालांही हाताला मिळेल त्या वस्तूने मारतो. त्यावेळी सोमनाथ हवालदार येतो. रत्नांचा बाप पोलीस केस करणार आहे. असे सोमनाथ सांगतो. हे जर मिटवायचं असेल तर पैशाची मागणी करतो.

बबनची रत्नासाठी झालेली घुसमट, रत्नांशी केललं प्रेम प्रकरणं बबनवर उलटतं याचे चित्रण लेखक सदानंद देशमुख यथार्थपणे मांडताना दिसतात. त्यामुळे कथानक समृध्द होते.

## " पैशाची "तहान " लागलेल्या बबन शेवाळेच्या कुटूंबाची दुर्दशा "

या कादंबरीतील मुख्य आख्यायसूत्रास उपआख्यायसूत्र कथानकाला व्यापकता आणून देते.

झोपडपट्टीतल्या रत्ना या देखण्या पोरीशी केलेलं प्रकरण बबनं शेवाळेवर उलटतं. हवलदार सोमनाथ, वार्ताहर प्रमोद बबनला ब्लॅकमेल करतात. आईकडचे पैसे हिसकावून आणूनं टी.व्ही. विकून बबन तुरुंगवास टाळायला काही हजार देतो, पण बाकीची रक्कम उभा न करता आल्यामुळे सरळ गावातून परागंदा होतो. जवळचा पैसा सरला, तो मिळवायचा पाणी विकायचा धंदाही बुडाला. तगडे बैल चढावर टाकी ओढून मरायला टेकले. बाप जमिनीला मिळला, दुषित पाणी पिऊन आई तापानं आजारी आली नि तरुणीताठी बहिण विनलग्नाची राहिली. पैशाची " तहान " लागलेल्या बबन शेवाळेच्या कुटूंबाची दुर्दशा वाचकांच्या मनाला चटका लावून जाते.

विकाऊ पाण्यामुळे गावाचे जीवन आणि ग्रामव्यवस्थेत अनेक परिवर्तने होतात. माणसांची मन बदलतात. प्रवृत्ती बदलतात. सामाजिक जीवनाचे सर्व स्तर आधार कोसळतात. आदरातिथ्य, पाहुणपण नाती-गोती, भावबंध असे सर्वच मानवीय संबधाचे बांध कलथून जातात उरते फक्त मानवातील पशुत्व...

राघोजी शेवाळे मुरल्या-कबिल्यावर जीवापाड प्रेम करतो. बैलावर असलेली त्याची माया आपल्या कुटूंबियापेक्षा अधिक आहे. बैलाचं राखण पाहून तो मनातल्या मनात गतत तळमळतो. शेती आणि बैलं हेच त्याचं जगण्याचं बळ असतं. रामकोर आणि बबन त्याला आपले

शत्रु वाटू लागतात. बबनचा पाण्याचा व्यवसाय बंद पडावा आणि आपल्या बैलांची त्याच्या कामातून मुक्तता व्हावी, म्हणून तो गावातल्या पाण्यासाठी चाललेल्या मोर्चा-सभामध्येही सहभागी होतो. राघोजी-रामकोर-बबन यांच्यातल्या ताणतणावाचे सूक्ष्म बारकावे सदानंद देशमुखांनी वास्तव पातळीवर टिपले आहेत.

बायको-मुलांच्या औदासीन्यातील राघोजी शेवाळे मात्र संतापतो आहे. त्याला बैलाकडे पाहणारी ही बाटकाची दृष्टी वाटते. अवघड वाटेनं बैल मोडतील हे भय त्याला कुरतडतं. त्याच वावर पोसणारे बैल त्याचं सर्वस्व आहेत. बायको मात्र आता त्याला टाकून पाडून बोलते, वेडजळी करते म्हणून तो केविलवाणी होतो आहे. " बटकीचा पैसा माणसाले एवढं बदलवते ! " [१६] त्याचं ही रक्त सळसळतं बायकोची बडबड त्याचं काळीज कुरतडू लागते.

ग्रामीण व्यवस्थेत जगताना अनेक ताणतणावं त्याना सहन करावे लागतात. काय स्वीकारायचे आणि काय नाकारायचे याबाबत त्याच्या मनात कधी संभ्रम असतो. तरी कधी स्पष्टता असते. नागरी जीवनाची ओढ कधी प्रचंड असते तर कधी अस्तित्व गांगारुन टाकते. बबन मात्र अभावग्रस्त कुटुंबात जन्मलेला नायक आहे. परिस्थिती जुळवून घेताना त्याला अनेक कष्ट सोसावे लागतात. त्याच्या मुळातल्या चांगुलपणाची कदर होत नाही म्हणून व्यवस्थेचा त्याच्या मनावर दबाव येतो. मार्ग सापडत नाही म्हणून बबन घर सोडून निघून जातो.

विदर्भातल्या चिखली-खामगांव यांना जोडणाऱ्या हमरस्त्यावर असलेल्या सारंगपूर गावातल्या बबन शेवाळे या शेतकरी तरुणाची, पाणी टंचाईने त्याला अचानक आलेल्या सुबतेची व टंचाई संपताच अपरिहार्यपणे झालेल्या दुर्दशेची कथा सदानंद देशमुख यांनी " तहान "

कादंबरीत मांडली आहे. गरिबीनं ग्रासलेला बबन शेवाळे आपल्या जमीन-बैलावर जीवापाड प्रेम करणारा। त्याचा सोशिक बाप राघोजी, नव-याशी उठसूठ भांडणारी त्याची जीवनकहाणी नेहमीच्या अवर्षणानं नारंगपूरची दुर्दशा उडते.

पिण्याच्या पाण्यामुळे गावचे जीवन, ग्रामव्यवस्थेतील परिवर्तने माणसांची मन याचे चित्र लेखक सदानंद देशमुख उभे करतात.

## " खेड्यातील व्यापा-यांची मतलबी वृत्ती "

कादंबरीतील मुख्य आशयसूत्राला व्यापकता वाढविण्यासाठी उपआशय सूत्राला प्रभावी करण्यासाठी खेड्यातील व्यापा-यांची मतलबी वृत्ती लेखक मांडताना दिसतात.

गाडी उलटते चाक मोडल्यानं लंगडी होते. तो नवी गाडी बघायला जातो, तेव्हा सतिश त्याला सांगतो की अनेकांना हाच पाण्याचा धंदा करायचा आहे, त्यांनाही गाड्या हव्या आहेत. बबन " कुसातूनं मोडल्या औतासारखा "[17] उदास होतो, असचं असतं एकानं किराणा दुकानं टाकलं की सगळेच टाकतात...चक्की. .ट्रॅक्टर.. जीप. .एकानं घेतलं की दुसरे घेतात. मग सगळ्यांचा धंदा बसतो.

पाणी आणून गावात विकण्याचा धंदा जोरात चालायचा. गावातल्या तळी, विहिरी, हापसे सगळे बंद पाण्याचा ठणठणाट सुरु होत त्यामुळे नोकरदार, हॉटेलवाले, पोलीस खात्यातील लोक बबनच्या टँकरभरल्या गाडीची आतुरतेने वाट पहात. मला की तुला, असा पाण्याचा धमाका उडायचा. त्यामुळे बबनच्या हातात नोटा-नाणी खुळखुळी लागली. हॉटेलवाले तर काही झाल्याखेरीज पाणी प्यायला देत नव्हते.

पाणी टंचाईचा फायदा घेऊन पैसे कमावण्याची संधी अनेकांना मिळते. गावातं बैलजोडी असलेले लोक पाण्याचा व्यापार करतात. पैशामुळे ते गाडी ओढणाऱ्या मुक्या जीवांचीही पर्वा करत नाहीत.

सारंगपूर हे गाव महामार्गाला जोडलेले असल्यामुळे शहरी संस्कृतीच्या छायेत विसावलेले आणि कालानुरूप बदल स्विकारणारे आहे. बबन, प्रमोद, मोहनं, सतिश, सारखे बेरोजगारं तरूण गावातंच काही उठाठेव करून लहान-सहान व्यवसाय करतात.

ग्रामीण भागात पत्रकार म्हणून काम करणारा प्रमोद, बबन करणाऱ्या पाण्याच्या व्यवसायावरं जळतं असतो. प्रमोद आपली व्यथा मित्रापुढे सांगतो - " आपून बी. ए. होऊन आपली कमाई काय त चाळीस, पन्नास रूपये ....ते बी कधी हायेत नाईत. .अन् हे धसकट तीन चारशे त सहजं कमावतं असल...[१८]

ग्रामीण भागातील व्यापाऱ्यांच्या वृत्ती-प्रवृत्ती याचे चित्र लेखक सदानंद देशमुख करतात. त्यामुळे कथानक समृद्द होते.

सारांश :

कादंबरीला प्रारंभ होतो तो बबन शेपाळेच्या उन्हाळी वातावरणातही पिराचा अवघड चढ चढून आणण्याच्या कामात पटाईत असलेल्या गुरल्या-छबिल्याच्या वर्णनाने. बाकीचे बैल वा-यांच्या दिवसात हा चढ चढू शकतात, पण इतरांना ते कठीण होते. तो चढ मरणाचा आणि बबनचे बैलही ताठ तब्येतीचे. त्याचा बाप प्रसिध्द बैल राखणारा. चारा-पाणी-खुराक यातून धिप्पाड बैल ठेवून त्यांच्यावर प्रेम करणारा. त्याच बैलांच्या जीवावर पाणी टंचाईच्या काळात पाण्याच्या टाक्या वाहून बबन नगद पैसा मिळवतो. कमाईच्या नादात आपल्या मालकीच्या ह जमिनीतील कामंही त्यानं तशीच पडू दिली आहेत. शेतकरी माणूस पाणक्या होऊन बंबाट कमाई करतो आहे. त्याला वाटतं, " महापूर पैसे कमवायचं साल, हे नवकरीवाले लय पैसे कमवतात, खुडणं खातात त्याच्यपेक्षा आपून लूटाव हेरी पाण्याचा कोन पैसा देते ? पाणी म्हणजे फिनकामाचं आस समजून तंटलवेड करतात सम्दे पण आता पाण्याचा एक एक थेंब अमृता-पेक्षाबी मोलाचा झाला. सम्दी दुनिया पाण्यासाठी तरसून धावधाव करून राहयली अन् पाणी देण्याच साधनं आपल्या ढुंगणाखाली हाये..[19]

एकटा बबन पाणी आणण्याच्या आणि पैसा मिळवण्याच्या वेडानं झुकावलेला नाही. त्याची आईही आता स्वप्नांनी नादावली आहे. आपला मुलगा मुठीनं कमावतो म्हणून " तिच्या अंगाला मोराचे पिसारे फुटल्यासारखं झालं. पाण्याची धार दारात यावी, तशी नोटांची धार दारात येत होती."[20] आता तिला सोन्याची पोथ आणि बांगड्या घालायची स्वप्न पडू लागली आहेत.

बायको मुलांच्या या ओढाताणीत राघोजी शेवाळे मात्र संतापतो आहे. त्याला बैलाकडे पाहणारी ही खाटकाची दृष्टी वाटते. अवघड वाटेनं बैल मोडतात हे भय त्याला कुरतडतं त्याचं दावर पोसणारे बैल, त्याचे सर्वस्व आहेत. बायको मात्र आता त्याला पाखून पाडून बोलते. बेइज्जती करते. म्हणून तो केविलवाणा होतो आहे. " बटकीचा पैसा माणसाले एवढे बदलवते "[21] त्याचं रक्त सळसळतं . बायकोची बडबड त्याचं काळीज कुरतडू लागते.

सगळया गावातचं पाण्याने डोळे वासायला लावले आहेत. हापशीवर पाण्यावरुनं भांडण सुरु होतात. पाण्यापायी रामा उमाळेची तेरा वर्षांची पोरगी कोरडया विहिरीत पडूनं मरुन जाते. पाण्याची कमाई ही तकलादू कमाई आहे म्हणून नांगर धरण्याची ओढ राघोजीला लागते पण मुलगी भावाजवळ घट्ट धरते.." टी. वी. अन् टेपरेकार्ट" या आईलाही टी.वी हवा आहे. राघोजीला वाटते की कास्तकाराच्या घरात त्या डबडयाचं काय काम ? बबनला तर आपण व्यापारी झाल्या-सारखे वाटते आहे. बबनला लोखंडी टाकीला तोटी असलेली टायरची गाडी घ्यायची आहे. आई त्याच्या खाण्याची काळजी करते आहे. आणि त्याचं तरुण मन झोपडपट्टीतल्या रतनाच्या भिजानं दूर दूर धावू लागलं आहे. गावातला शिकलेला प्रमोदही दात खाऊन आहे. " आपून बी. ए. होऊन आपली कमाई काय त चाळीस पन्नास रुपये... ते बी कधी हायेत कधी नाईत...अन् हे धसकट तीन-चारशे त सहज कमावतं असल. "[22] ही व्यथा त्याला बोचकारते आहे. गावातली तरणी-ताठी पोरगी मरुन जाते आणि मोहन सारखा तरुण मात्र म्हणतो-
" साले सम्द रगत झालं पाण्यात. खडकावर काळावर आता काई हया इहिरींच पाणी घ्यायच्या कामी येत नाही. "[23]

बबनला लागलेली तरूण चटकं गाडीकडेही त्याचं दुर्लक्ष करवते. गाडी उलटते. चाक मोडल्यानं लंगडी होते. तो नवी गाडी बघायला जातो तेंव्हा सतीश त्याला सांगतो की अनेकाना हाच पाण्याचा धंदा करायचा आहे, म्हणूनंही त्याना गाड्या हव्या. बबन "कुणातून मोडल्या औताप्रारखा" उदास होतो. बबनचं लक्ष आता आपल्या बैलाकडे जातं. त्याच गब्राठलेलं रूप त्याला जाणवतं घरी आल्यावर त्याला चारा जळल्याचं समजतं. त्यानं रत्नाच्या गडबडींत बैलांना पाणीही पाजलं नसतं. बाप मात्र आकांत करीत असतो आई आणि बहिण टी.वी. पाहण्यात मग्न असतात.

आईकडे पैसे मागणाऱ्या बबनला उत्तर मिळतं की पैसे सोनाराला दिले पोथ करायसाठी, पाणी-पाणी करणारं गाव, पाण्याच्या जोरावर पैसा मिळवणारा बबनं आणि त्यातूनं राहिली स्वप्नं पूर्ण करणारी त्याची आई रामकोर, बैलाच्या त्रासानं व्याकुळणारा बाप राघोबा असं एक गरगरणारं चित्र आगल्यापुढे साकारतं, शेजारचं पारखेड गाव आगीत राख होतं, गुरढोरांचा आंकात, जळका उग्र वास यानी आसमंत भरून जाते.

" आग झुलवायची तरी कशी ? पाणी तरी कुठून आणायचं ? घरात प्यायले पाणी नाई..."[२४] ही व्यथा म्हातारेकोतारे सांगत राहतात. त्याचे शब्दही जणू कोळसा झालेले. आपल्या बिडीपायी आग लागली म्हणूनं पुजाजी जुमडे वेड लागल्यासारखा ओरडत राहतो. शेवटी बैलाच्या कान-यानचं फाशी लावून मरतो गावात पाणी प्रश्नावर उपोषण सुरु होतं.

बबनच्या मनातं काहूर माजतं, गावात टँकर आला तर पाण्यासाठी पैसा कोण मोजेल ? मनातील चीड व्यक्तं करण्यासाठी तो बैलाना काठी हाणू लागतो. आपल्या कमाईवर जळणाऱ्या लोकांसाठी तो बैलांना घामाघूम होत मारु लागतो पण त्याचं मन स्थिर नाही.
" काम करु करु खायाले फुरसत भेटत नाई, त्यापायी त्यासयेच्या

गळ्ळल्या अंगाचे आता सांगाडे झाले. सरचं आजून लय हरामी हाये. मुक्या जनावराची हेळणा लावली. आपल्याले हे पाप या जल्मी अन् ऊरलूर पुढल्या जल्मीबी भोगानं लागलं..."[२५] बबन गहिवरुनं रडू लागतो. पीराच्या चढावर बैलामधला जोम भरतो. गाडी मागे मागे सरकायला लागते.

गावातल्या गोर्चानं लाठीहल्ला होतो. त्या झोंबाझोंबीत राघोजीचा पाय मोडतो. बायकोला वाटतं हा मोर्चात तडफडला, दवाखान्यावर खर्च झाला, तेवढ्यात सोन्याचा दागिना झाला असता. गावात हापशी बसते. पण सोनार पाणी साटकळतं ठेवण्याजोगं असतं. गावात टँकर येऊ लागतो. बबनची गिऱ्हाईकं तुटतात. ढाब्यावरही ड्रायव्हरच्या कृपेनं टँकरचं पाणी थोड्या पैशात येऊ लागते. बबन मात्र रत्नाच्या बोलामुळे पोलिसांच्या तावडीत सापडतो. सोमनाथ सारखा पोलिसांही जुन्या गोष्टी पुन्हा पुन्हा बोलतो. " पाणी कधी फुकट नाही आणि आता पाया पडतो."[२६] हे ऐकत राहतो. प्रमोद-मोहन-सोमनाथ बबनला दहा हजारांचा गंडा घालतात.

बबन आता मनाने थकतो, घरातला टी.वी. विकूनपैशाची भर करतो. भयानं घुसमटलेल्या वातावरणांत जगू लागतो पाण्याचा धंदा थांबवतो.

कादंबरीच्या शेवटी राघोजीला होणारे भास आठवल्यामुळे येतात. गावातल्या दावणी सुनसान, गोठे सुनसानं, ढोरवं काय, ढोरायचं कोणी नाई. गाय नाई, बैल नाई, म्हशी नाई, कुत्रे गधाड कावळे..[१७] पाण्याची धार येते, रामकोर तोंड बाजूला करत नाही, तिची तहान सरत नाही. कावळ्याच्या काव काव आवाजात कादंबरी संपते.

मुख्य आशयसूत्रास भरघोस करणारी उपआशयसूत्रे व त्यांचे एकमेकाशी असणारे संपन्न नाते निर्माण करून सदानंद देशमुख " तहान" या कादंबरीची संरचना निर्माण करतात.

## प्रकरण दुसरे

## " संदर्भ ग्रंथ "


१. सदानंद देशमुख : " तहान " कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. १९८८, प्र. आ. पृ. मनोगत.

२. तत्रैव : मनोगत

३. तत्रैव : पृ. ४९

४. तत्रैव : पृ. १५

५. तत्रैव : पृ. ५१

६. तत्रैव : पृ. ८२

७. तत्रैव : पृ. १२२

८. तत्रैव : पृ. २०४

९. तत्रैव : पृ.६५

१०. तत्रैव : पृ. २९

११. तत्रैव : मनोगत

१२. तत्रैव : पृ. ५

१३. तत्रैव : पृ. ७

१४. तत्रैव : पृ. ७

१५. तत्रैव : पृ. १०५

१६. तत्रैव : पृ. ९

१७. तत्रैव : पृ. ६६

१८. तत्रैव : पृ. ४७

१९. तत्रैव : पृ. ५

२०. तत्रैव : पृ. ६

२१. तत्रैव : पृ. ६

२२. तत्रैव : पृ. ४७

२३. तत्रैव : पृ. ५१

२४. तत्रैव : पृ. ४२

२५. तत्रैव : पृ. १०१

२६. तत्रैव : पृ. १६२

२७. तत्रैव : पृ २०४